पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ३९**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **सोमवार दि. १८/१२/२०१७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १५३२**

मा.दीपक पोटे यांचे दि. ११/१२/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. १३ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७ – १८ चे अंदाजपत्रक, | | |
| १)पान क्र.२५१, अ.क्र.१२, प्रभाग क्र.१३ अ मध्ये गणेशनगर येथील ओटा वसाहत येथे कचरा प्रकल्प चालू करणे | १० लाख | --- |
| २) पान क्र.२५१, अ.क्र.१३, प्रभाग क्र.१३ अ मध्ये स्वच्छ अभियाना अंतर्गत स्टेनलेस स्टीलच्या डस्टबिन बसविणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे – | | |
| १) प्रभाग क्र.१३ अ मध्ये वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रभाग समिती हॉल मध्ये फर्निचर व्यवस्था करणे. | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.१३ अ मध्ये वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयांतर्गत कॉम्पॅक्टर खरेदी करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १५३३**

मा.सौ.ज्योती गोसावी यांचे दि. ११/१२/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.३४ब, मध्ये विविध ठिकाणी ओपन जिमचे साहित्य खरेदी करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे यादी क्र.एसजे१०, पान क्र.२३८, अ.क्र.४७१, प्रभाग क्र.३४ब, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र करणे. | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम – | | |
| प्रभाग क्र.३४ब, मध्ये विविध ठिकाणी ओपन जिमचे साहित्य खरेदी करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १५३४**

मा.श्रीमती स्मिता वस्ते यांचे दि. १२/१२/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. २९ क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७ – १८ चे अंदाजपत्रक, | | |
| १)झेडई१६बी१०२/एसडी२-१०२३, प्रभाग क्र.२९ क मध्ये लक्ष्मीनगर येथे जुनी जीर्ण झालेली ड्रेनेज लाईन बदलून नवीन टाकणे | १० लाख | --- |
| २) झेडई१६बी१०२/एसडी२-१०२६, प्रभाग क्र.२९ क मध्ये पर्वती दर्शन येथे विविध | | |

| | | |
|---|---|---|
| ठिकाणी ड्रेनेज लाईन बदलणे | १० लाख | --- |
| ३) झेडई१६बी१०२/एसडी२-१०२८, प्रभाग क्र.२९ क मध्ये पंचशील चौक येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन साफ करणे व नविन टाकणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे - | | |
| १) प्रभाग क्र. २९ क मध्ये महात्मा फुले वसाहत समोर चाळ क्र. ५६-५७ लक्ष्मीनगर येथे नविन ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र. २९ क मध्ये चाळ क्र. १०९, ११०,१११,११२ पर्वती दर्शन येथे नविन ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र. २९ क मध्ये चाळ क्र. ९४, ९५,१०२, १०४ पर्वती दर्शन येथे नविन ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १० लाख |

**विषय क्र. १५३५**

मा.आदित्य माळवे यांचे दि. १२/१२/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.७क, मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२३०, अ.क्र.९१, प्रभाग क्र. ७ क ई-स्केअर शेजारील विजय हौसिंग सोसायटीमध्ये असलेल्या रेंजहिल्स कॉर्नर हजेरी कोठी बांधणे | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे- | | |
| १) प्रभाग क्र.७क, मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.७क, मध्ये विविध भितींवर भित्तीचित्रे रंगविणे. | --- | ५ लाख |

**विषय क्र. १५३६**

मा.संजय भोसले यांचे दि. १३/१२/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. ६ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७ - १८ चे अंदाजपत्रक, | | |
| १) प्रभाग क्र ६ ड मध्ये अशोकनगर,माणिकनगर,सुरक्षानगर व इतर सोसायटीमधील अंतर्गत ड्रेनेज लाईन बदलणे, बजेट कोडः- झेड.ई.१६बी१०२/एस डी२-५१९ | १५ लाख | --- |
| २) प्रभाग.क्र ६ ड मध्ये सुरक्षानगर सोसायटीमध्ये ड्रेनेज लाईन टाकणे, बजेट कोडः- झेड.ई.१६बी१०२/एस डी२-५२१ | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे - | | |
| १) प्रभाग क्र. ६ ड मध्ये भाटवस्ती येथे ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रीटीकरण करणे. | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र. ६ ड मध्ये लक्ष्मीनगर तिरंगा मित्र मंडळ येथे ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रीटीकरण करणे. | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र. ६ ड मध्ये निळा झेंडा चौक परिसर येथे ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रीटीकरण करणे. | --- | १० लाख |

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. १५३७**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) कार्यालयाकडील माहे नोव्हेंबर २०१७ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ-१/६०७ दि.११/१२/२०१७ चे पत्र.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. १५३८**

पुणे महानगरपालिकेच्या श्रीमती मंदा शिवाजी पवार, वरिष्ठ लिपिक तथा संपर्क अधिकारी व श्री.विश्वनाथ शंकर भानगिरे, शिपाई, कोंढवा–वानवडी क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत कोंढवा संपर्क कार्यालय यांचे विरुध्द सक्षम न्यायालयात खटला दाखल करण्यास पूर्व मंजूरी दिल्याची बाब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५९–अ नुसार मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था/६०८ दि. ११/१२/२०१७ चे पत्र.

**विषय क्र. १५३९**

पुणे महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागातील श्री.रमेश वामनराव शेलार, मुख्य सुरक्षा अधिकारी (वर्ग–१) यांच्या निलंबन कालावधीची पाचवी सहामाही दि. २३/२/२०१७ पासून दि. २२/८/२०१७ रोजी पूर्ण झालेली सहामाही महानगरपालिका सेवाविनियम मधील प्रकरण ६ वे क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/साप्र/६११ दि. १२/१२/२०१७ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. १५४०**

मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर, मा.सौ.सुनिता वाडेकर, मा.कु.हिमाली कांबळे, मा.सौ.सोनाली लांडगे व मा.सौ.फरजाना शेख यांचे दि. ४/१२/२०१७ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महोत्सव साजरा करणेत येतो. सन २०१७ चा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महोत्सव दि. २१.१२.२०१७ ते २५.१२.२०१७ या कालावधीत गणेश कला मंदिर स्वारगेट, पुणे या ठिकाणी साजरा करणेत यावा.

सदर महोत्सवासाठी सन २०१७–२०१८ च्या अंदाजपत्रकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महोत्सव या अर्थशिर्षकावर र.रू. २०,००,०००/– इतकी तरतुद केली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महोत्सवात खालील कार्यक्रमाचा समावेश करणेत यावा.

| अ.क्र. | दिनांक | कार्यक्रमाचे नाव | कलाकार | र.रू. |
|---|---|---|---|---|
| १. | २१–१२–२०१७ | भीम संध्या | स्वप्निल बांदोडकर, रविंद्र साठे, उत्तरा केळकर, अभिजित कोसंबी हे प्रसिध्द पार्श्वगायक प्रस्तुत २५ कलाकार | ४.५० लाख |
| २. | २२–१२–२०१७ | मी मराठी | नंदेश उमाप प्रस्तुत ७५ ते ८० कलाकार | ३.५० लाख |
| ३ | २३–१२–२०१७ | शिंदेशाही तोडा | वैशाली सामंत, आदर्श शिंदे , १४ सहकलाकार | ४.५० लाख |
| ४ | २४–१२–२०१७ | भीमगीतांचा कार्यक्रम | वैशाली माडे व अभिजित कोसंबी व सहकलाकार | ४.लाख |
| ५ | २५–१२–२०१७ | भीमगीतांचा कार्यक्रम सोनियाची उगवली सकाळ | आनंद शिंदे आणि सह कलाकार | ३.५० लाख |
| | | | एकूण अंदाजे खर्च | २०. लाख |

सांस्कृतिक कार्यक्रमाचे टेंडर न काढता कार्यक्रमात सहभागी कलाकारांना/संस्थांना आर.टी.जी.एस मार्फत त्यांच्या बँक अकाऊंटवर मानधन अदा करणेस मान्यता घेण्यात आलेली असून तसा मा.स्थायी समितीचा ठराव पारित झालेला आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करणेस व सहभागी कलाकारांना /संस्थांना आर.टी.जी.एस. मार्फत त्यांच्या बँक अकाऊंटवर मानधन अदा करणेस मान्यता मिळणेस.

सदर महोत्सवामधील वर्तमानपत्रातील जाहिरात/फ्लेक्स , स्पीकर व्यवस्था , लाईट व्यवस्था, ट्रॉफिज प्रोजेक्टर, फोटो , हार व सजावट इ. सर्व व्यवस्था संबंधित खात्यामार्फत करणेत यावी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.११/१२/२०१७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५४१**

मा.प्रमोद उर्फ नाना भानगिरे, मा.सुनिल कांबळे व मा.अविनाश बागवे यांचे दि. २०/६/२०१७ चे पत्र.

पुणे महापालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने काढलेल्या सी.एफ.सी. च्या निविदेत अनेक त्रुटी आहेत. कमी दर आलेल्या ठेकेदाराला यामध्ये डावलले जात आहे.

त्यामुळे मा.स्थायी समिती ठराव क्र. २२७९ दि. २७/१२/२०१६ चा फेरविचार करावा.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.११/१२/२०१७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५४२**

प्रभाग क्र. ८ मधील औंध येथील रामचंद्र गायकवाड रस्त्यावरील शीतल अपार्टमेंट (महादजी शिंदे रस्ता व रामचंद्र गायकवाड रस्ता टी जंक्शन) ते आंबेडकर चौक हा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१०(१)(अ) अन्वये २४ मीटर ऐवजी ३० मीटर रुंदीचा आखण्याबाबत मा.सौ.अर्चना मुसळे व मा.सौ.सुनिता वाडेकर यांचे दि. २८/८/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ७१४ दि. २९/८/२०१७ ला अनुसरुन मा.महा.आयुक्तयांनी जा.क्र. मआ/भूसंपादन/५४२ दि. २३/११/२०१७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.११/१२/२०१७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५४३**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२मध्ये वसूल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/४१३ दि.२७/९/२०१७ चे पत्र.

१. मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भाकिंत क्र. ९ मा. स्थायी समिती ठ.क्र. २२७६, दि.२७/१२/२०१६ प्रमाणे कार्यवाही करणेस.

२. कर आकारणी व करसंकलन कार्यालयाकडून यापुर्वी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२ प्रमाणे वसुल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेबाबत तयार करण्यात आलेली ८६ प्रकरणे व त्यांची माहे सप्टेंबर २०१७ अखेर रक्कम रुपये १४,९६,८४,४०५/- निर्लेखित करणेबाबत कागदपत्राची तपासणी करण्यात आली असून मिळकतकर रक्कम निर्लेखित करणे बाबत कार्यवाही करणेस.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.११/१२/२०१७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५४४**

पुणे शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या/काम करणाऱ्या मुलांकरीता दिवस-रात्र निवारा प्रकल्प सुरू करणे करीता खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सविवि/४५७,दि.१६/१०/२०१७ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. १४८ दि.२२/११/२०१७ विचारासाठी.

१. पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग, शिक्षण विभाग, भवन रचना विभाग व रेनबो फाउंडेशन, १-१-७११/सी/१, विष्णू रेसिडेंसी समोर, गांधीनगर, हैद्राबाद-५०००८०, बजाज फिनसर्व कंपनी, पुणे यांचे संयुक्त सहकार्याने ६ ते १८ वयोगटातील पुणे शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या/काम करणाऱ्या मुलांकरीता दिवस-रात्र निवारा प्रकल्प सुरू करणेस.

२. पुणे महानगरपालिका शिक्षण विभाग मार्फत शाळांच्या मोकळ्या वर्ग खोल्या, बंद पडलेल्या शाळा दिवस-रात्र निवारा प्रकल्प करीता उपलब्ध करून देणेस.

३. पुणे महानगरपालिका भवन रचना विभागामार्फत दिवस-रात्र निवारा प्रकल्प सुरू करणे करीता वर्ग खोल्यांचे नुतनीकरण करणे, इन्फ्रास्ट्रक्चर सुविधा व तद्नुषंगिक सोयी, सुविधा उपलब्ध करणेस.

४. रेनबो फाउंडेशन,१-१-७११/सी/१, विष्णू रेसिडेंसी समोर, गांधीनगर, हैद्राबाद-५०००८०, बजाज फिनसर्व कंपनी पुणे यांचे समवेत ५ वर्ष कालावधी करीता करारनामा करणेस.

५. रस्त्यावरील मुलांकरीता दिवस-रात्र निवारा करीता O&M cost उपलब्ध होणेसाठी मे. राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस. दिवस-रात्र निवारा करीता O&M cost ला मान्यता मिळेपर्यंतचा संपूर्ण खर्च पुणे महानगरपालिका कडील उपलब्ध तरतूदमधून (FE14C208 - पुणे शहरातील रस्त्यांवरील मुलांकरीता मोबईल स्कूल सुरू करणे र.रू. १०.०० कोटी) करणेस.

६. सदर प्रकल्पाच्या व्यवस्थापन करीता मे. राज्य शासनाकडून तरतूद उपलब्ध न झाल्यास पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये दरवर्षी तरतूद उपलब्ध करणेस व त्यामधून खर्च करणेस.

७.बजाज फिनसर्व कंपनी - कंपनी सोशल रिसपॉन्सबिलिटी ॲक्ट अंतर्गत बजाज फिनसर्व कंपनीमार्फत विद्यार्थ्यांकरीता दिवस-रात्र निवारा उपलब्ध करणे अंतर्गत खर्च करणेस. या बाबतचा तपशिल या विषयक करणेत येणाऱ्या करारनामामध्ये दर्शविणेत आला आहे. सदर प्रकल्पासाठी सी.एस.आर. अंतर्गत उपलब्ध

करून देणेत आलेली तरतूद व कार्याचा दरमहा अहवाल संस्थेमार्फत पुणे महानगरपालिकेकडे सादर करणेस.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.११/१२/२०१७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५४५**

पुणे पेठ कोथरुड स.नं. ८७/७ अ चे मिळकतीचे बक्षिसपत्र पुणे मनपास लिहून देणेस श्री.रामचंद्र नाना सुतार यांचे वारस तयार नसल्याने सदर क्षेत्र पुणे मनपाचे नावे मालकी हक्काने प्राप्त करुन घेणेकरीता प्राप्त कायदेशीर अभिप्रायानुसार मूळ मालक यांचे विरुध्द पार्ट परफॉरमन्सचा दावा दिवाणी न्यायालयात दाखल करणेकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८१ अन्वये मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/५७८ दि.३०/११/२०१७ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.११/१२/२०१७ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. १५४६**

पुणे महानगरपालिका हद्दीबाहेरील मौजे मांगडेवाडी, भिलारेवाडी व गुजर-निंबाळकरवाडी या ग्रामपंचायत हद्दीमध्ये मुख्य मलवाहिनी विकसित करणे हे काम करणेसाठी व पुणे मनपाचा निधी खर्च करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ८९ नुसार त्यांच्या हद्दीपर्यंत काम करणेसाठी खालीलप्रमाणे मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मलनि/६०६ दि.११/१२/२०१७ चे पत्र.

१) पुणे म.न.पा हद्दीबाहेरील मौजे मांगडेवाडी, भिलारेवाडी व गुजर-निंबाळकरवाडी या ग्रामपंचायती त्यांची अंतर्गत मलवाहिन्या विकसीत करणार आहेत तेथ पर्यंत मनपा हद्दीबाहेर मलवाहिनी विकसीत करणे हे काम करणेस.

२) मौजे मांगडेवाडी, भिलारेवाडी व गुजर-निंबाळकरवाडी या ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये मुख्य मलवाहिनी विकसित करणेसाठी अंदाजे तरतुद र.रु. १०.०० कोटी उपलब्ध करुन देणेस.

३) पुणे म.न.पा हद्दीबाहेरील मौजे मांगडेवाडी, भिलारेवाडी व गुजर-निंबाळकरवाडी या ग्रामपंचायतीमध्ये तयार होणारे मैलापाणी शुध्दीकरणासाठी पुणे म.न.पा स येणारा खर्च संबंधीत ग्रामपंचायतीकडून वसूल करणेस त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्याचे अटी व शर्ती निश्चित करणेसाठी मा. महापालिका आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस.

**राजेंद्र शेवाळे**
**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**